Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणमंडळ, स.नं. ८३२–ए, फा. प्लॉटनं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकररिसर्चइन्स्टिटयूटच्यामागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./संशोधन/पापुअ/ई/ 4039
पुणे - 411004
दिनांक - 11/10/2024

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व विभागीय मंडळे

15 OCT 2024
Inward No. 4542

विषय :- व्यवसाय शिक्षण योजनेअंतर्गत सुरू असलेल्या Automotive, PlumbingवElectronicsया विषयाच्या JobRole मध्ये बदल करणेबाबत

संदर्भ :- राज्य प्रकल्प समन्वयक तथा सहसंचालक (प्रशासकीय) समग्र शिक्षा मुंबई यांचे जा.क्र.समग्र शिक्षा/व्य.शि.७०/२०२४/२६३३, दि. ०४ सप्टेंबर २०२४ चे पत्र.

उपरोक्त संदर्भाधिन विषयास अनुसरून कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इ. १० वी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा इ. १२ वी मार्च–२०२५ पासून NSQF अंतर्गत Automotive, Plumbing व Electronics या विषयाचा सुधारित जारी केलेल्या अभ्यासक्रमामध्ये झालेल्या बदलाबाबत वरील संदर्भीय राज्य प्रकल्प संचालक,समग्र शिक्षा, मुंबई यांचे पत्रानुसार आपल्या विभागातील मान्यताप्राप्त माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून द्यावे व सदर परिपत्राकानुसार त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास कळविण्यात यावा. सुलभ संदर्भासाठी सोबत परिपत्रक पाठविण्यात येत आहे.

सदर परिपत्रक मंडळाच्या https://www.mahahsscboard.inया वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

सोबत:- या कार्यालयाचे परिपत्रक

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे ०४

प्रत माहिती व आवश्यक त्याकार्यवाहीसाठी:

१) मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई
२) मा.शिक्षण संचालक (माधमिक व उच्च माध्यमिक), शिक्षणसंचालनालय, पुणे.
३) विभागीय शिक्षणउपसंचालक, सर्व विभाग.
४)सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सर्व जिल्हा परिषद.
५) शिक्षण निरिक्षक, उत्तर/दक्षिण/पश्चिम, मुंबई.

मा.सहा.सचिव / उपसचिव / वि.सचिव / वि.अध्यक्ष

# महाराष्ट्र राज्यमाध्यमिकव उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे – ४११००४

**परिपत्रक क्रमांक रा.मं/पापुई/इ.१0वी व इ.१२वी व्यवसाय अभ्यासक्रम/ मूल्यमापन योजना/५०३४, दिनांक-११/१०/२०२४.**

विषय :-समग्र शिक्षा अभियानांतर्गत माध्यमिक/उच्च माध्यमिक स्तरावरील व्यवसाय शिक्षणाच्या योजनेंतर्गत सुधारित अभ्यासक्रमानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सुरुकरणेबाबत

संदर्भ :-

१) समग्र शिक्षा मुंबई यांचे जा.क्र, रामशिअ/व्य.शि./४४ (७१/१६)२०१९/८९१ दि.१४ ऑगस्ट २०१९ चे पत्र.

२) मा. सह. संचालक (प्रशा) तथा उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, समग्र शिक्षा यांचे जा.क्र. रामाशिअ/व्यशि/(७१/१६)२०१९/१८७३ दि.१७ सप्टेंबर २०२० चे पत्र.

३) रा.मं.परिपत्रक क्र.रा.मं./पापुई/इ.०९वी व इ ११ वी व्यवसाय अभ्यासक्रम/४३९३, दिनांक १३ ऑक्टोबर२०२० चे परिपत्रक.

४) राज्य प्रकल्प समन्वयक तथा सहसंचालक(प्रशासकीय) समग्र शिक्षा मुंबई यांचे जा.क्र.समग्र शिक्षा/व्यशि.४४/(७१/१६)२०१९/३२४० दि.२९ ऑक्टोबर २०२१ चे पत्र.

५) राज्य प्रकल्प संचालक समग्र शिक्षा मुंबई यांचे जा.क्र.समग्र शिक्षा/व्य.शि.२/२०२२-२३ /२७३९ दि.३० सप्टेंबर २०२२ चे पत्र.

६) राज्य प्रकल्प समन्वयक तथा सहसंचालक( प्रशासकीय) समग्र शिक्षा मुंबई यांचे जा.क्र.समग्र शिक्षा/व्य.शि.०२/२०२३-२४/२४९२, दि.३० ऑगस्ट २०२३ चे पत्र.

७) राज्य प्रकल्प समन्वयक तथा सहसंचालक (प्रशासकीय) समग्र शिक्षा मुंबई यांचे जा.क्र.समग्र शिक्षा/व्य.शि.७०/२०२४/२६३३, दि. ०४ सप्टेंबर २०२४ चे पत्र.

राज्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळाप्रमुखांना या पत्रकान्वये कळविण्यात येते कि, समग्र शिक्षा अंतर्गत राज्यात व्यवसाय शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर योजनेची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. सदर विषय कोणत्या विषयास पर्याय म्हणून राहणार आहे, या संदर्भात शासन निर्णय दिनांक २१ ऑगस्ट, २०१४ व शुद्धिपत्रक दिनांक १४ म,२०१५ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. सदर निर्णयानंतर सुधारित शासन निर्णय व्य.शि.२०१९/प्र.क्र.७०/एसडी-६, दिनांक ३ ऑक्टोबर, २०१९ द्वारे आदेश निर्गमित झालेले आहेत.

या मंडळाचे संदर्भीय परिपत्रक क्र.०३ चे अवलोकन व्हावे. सदर परिपत्रकानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून इ.०९वी,११वी व शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इ.१०वी,१२वीच्या सुधारित विषयाच्या अभ्यासक्रम, विषय व विषयांचे कोड क्रमांक कळविण्यात आलेले असून, सदर सुधारित जॉब रोल अभ्यासक्रमानुसार माध्यमिक शालांत/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२१ चे आयोजन होणार असल्याचे नमूद करण्यात आलेले होते. तथापि, इ.०९वी,११वीच्या मूल्यमापन योजनेमध्ये कोणताच बदल नसल्यामुळे (लेखी परीक्षा – ३० गुण- [८० गुणांची परीक्षा घेवून ३० गुणांत रुपांतर करणे.]) सदर परिपत्रकामध्ये नोंद केल्याप्रमाणे इ.०९वी,११वीसाठी मूल्यमापन योजना लागू राहील.

तसेच संदर्भीय पत्र क्र.०५ व ६ च्या पत्रान्वये समग्र शिक्षा, मुंबई यांच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२मध्ये इ.०९वी व शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये इ.१०वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठीPhysical Education and Sports(९६) हा विषय सुरु करण्यात आलेला आहे.शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये इ.०९वी व शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इ.१०वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विषय कोड क्रमांक ९४ व ९९ हे विषय सुरु करण्यात आलेले आहे.

संदर्भीय पत्र क्रं.७ च्या पत्रान्वये समग्र शिक्षा, मुंबई यांच्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इ.०९वी व शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये इ.१०वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी X2-Automobile, X8-Electronics व 98-Plumber या सेक्टर मधील जॉब रोल मध्ये बदल सुचविण्यात आला आहे. त्याप्रमाणे याविषयांच्या सांकेतिक कोड मध्ये बदल न करता फक्त विषयाच्या नावामध्ये व अभ्यासक्रमामध्ये बदल सुचविण्यात आलेला आहे. त्यानुसार NSQF अंतर्गत विषयांचा तपशील खालीलप्रमाणे,

## १) NSQFअंतर्गत इ.१० वी -

| अ.क्र. | विषय कोड क्रमांक | अभ्यासक्रम विषयाचे नाव | इ.९ वी साठी सुधारित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष | इ.१०वी साठी सुधारित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | X1 | Multi Skill Assistant Technician/ Introduction to Basic Technology | २०१९-२० पासून | २०२०-२१ पासून |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | X2 | Four Wheeler Service Assistance | २०१९-२० पासून (पहिला सुधारित अभ्यासक्रम)<br>२०२३-२४ पासून (दुसरा सुधारित अभ्यासक्रम) | २०२०-२१ पासून (पहिला सुधारित अभ्यासक्रम)<br>२०२४-२५ पासून (दुसरा सुधारित अभ्यासक्रम) |
| ३ | X3 | Store Operational Assistance | २०१९-२० पासून | २०२०-२१ पासून |
| ४ | X4 | Assistance Beauty Therapist | २०१९-२० पासून | २०२०-२१ पासून |
| ५ | X6 | Tourism and Hospitality- Food & Beverage Service Trainee | २०१९-२० पासून | २०२०-२१ पासून |
| ६ | X7 | Agriculture.- Solanaceous Crop Cultivator | २०१९-२० पासून | २०२०-२१ पासून |
| ७ | X8 | Electronics and Hardware – Junior Field Technician- Home Appliance | २०१९-२० पासून (पहिला सुधारित अभ्यासक्रम)<br>२०२३-२४ पासून (दुसरा सुधारित अभ्यासक्रम) | २०२०-२१ पासून (पहिला सुधारित अभ्यासक्रम)<br>२०२४-२५ पासून (दुसरा सुधारित अभ्यासक्रम) |
| ८ | X9 | Health Care- Home Health Aid | २०२०-२१ पासून | २०२१-२२ पासून |
| ९ | 94 | IT's - Domestic data entry operator | २०२२-२३ पासून | २०२३-२४ पासून |
| १० | 95 | Power – Consumer Energy Meter Technician | २०१९-२० पासून | २०२०-२१ पासून |
| ११ | 96 | Physical Education and Sports | २०२१-२०२२ पासून | २०२२-२३ पासून |
| १२ | 97 | Apparels – Sewing Machine Operator | २०१९-२० पासून | २०२०-२१ पासून |
| १३ | 98 | Plumber – Assistant Plumber General | २०२१-२२ पासून (पहिला सुधारित अभ्यासक्रम)<br>२०२३-२४ पासून (दुसरा सुधारित अभ्यासक्रम) | २०२१-२२ पासून (पहिला सुधारित अभ्यासक्रम)<br>२०२४-२५ पासून (दुसरा सुधारित अभ्यासक्रम) |
| १४ | 99 | BFSI-Micro Finance | २०२२-२३ पासून | २०२३-२४ पासून |

उपरोक्त X2- Automobile, X8-Electronics व 98-Plumber या विषयांची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२५ मध्ये सुधारित अभ्यासक्रम व मूल्यमापन आराखड्यानुसार आयोजित करण्यात येणार आहे. उर्वरित इतर सर्व विषयांची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२५ मध्ये प्रचलित अभ्यासक्रम व मूल्यमापन आराखड्यानुसार आयोजित करण्यात येणार आहे. NSQF अंतर्गत इयत्ता १० वी विषय क्रमांक X2,X8 व 98 या विषयाच्या अभ्यासक्रमा मध्ये मार्च २०२५ पासून

बदल सुचविण्यात आले आहेत, तरी सदर विषयामध्ये उत्तीर्ण न झालेल्या विद्यार्थ्यांस व श्रेणी सुधार योजने अंतर्गत प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांस X2.X8 व 98 जुन्या अभ्यासक्रमा नुसार लागणाऱ्या तीन म्हणजेच सन २०२३-२४ मधील पुरवणी परीक्षा व मार्च २०२५ ची नियमित परीक्षा व जुलै २०२५ ची पुरवणी परीक्षा या तीन संधी देण्यात येणार असून जुलै २०२५ च्या परीक्षेनंतर कोणतही संधी दिली जाणार नाही.जे विद्यार्थी मार्च २०२५ किंवा त्यापूर्वी दोन संधी देवूनही सदर विषयामध्ये उत्तीर्ण झालेले नाहीत त्या विद्यार्थ्यांना NSQF अंतर्गत उपरोक्त बदललेला विषय न घेता भाषा अथवा सामाजिक शास्त्रे या विषयांपैकी जो विषय वगळला असेल, तो वगळलेला विषय घेवून पुनश्च परीक्षेस प्रविष्ठ होवून, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल.

२) NSQFअंतर्गत इ.१२ वी -

| अ.क्र | विषय कोड क्रमांक | अभ्यासक्रम विषयाचे नाव | इ.११वी साठी सुधारित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष | इ.१२वी साठी सुधारित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | E3 | MultiskillTechnician (Electrical) | २०१६-१७ पासून | २०१७-१८ पासून |
| २ | E6 | Multiskill Technician (Food Processing) | २०१६-१७ पासून | २०१७-१८ पासून |
| ३ | F6 | Electronics – Field Technician- Other Home Appliances | २०१९-२० पासून (पहिला सुधारित अभ्यासक्रम) २०२३-२४ पासून (दुसरा सुधारित अभ्यासक्रम) | २०२१-२२ पासून (पहिला सुधारित अभ्यासक्रम) २०२४-२५ पासून (दुसरा सुधारित अभ्यासक्रम) |
| ४ | F8 | Power – Distribution Lineman | २०२०-२१ पासून | २०२१-२२ पासून |
| ५ | G1 | Specialized Sewing Machine Operator | २०२०-२१ पासून | २०२१-२२ पासून |
| ६ | G2 | Plumber General – II – Advance Plumbing Technician | २०२०-२१ पासून (पहिला सुधारित अभ्यासक्रम) २०२३-२४ पासून (दुसरा सुधारित अभ्यासक्रम) | २०२१-२२ पासून (पहिला सुधारित अभ्यासक्रम) २०२४-२५ पासून (दुसरा सुधारित अभ्यासक्रम) |
| ७ | G3 | Four-Wheeler Service Technician | २०१९-२० पासून (पहिला सुधारित अभ्यासक्रम) २०२३-२४ पासून (दुसरा सुधारित अभ्यासक्रम) | २०२०-२१ पासून (पहिला सुधारित अभ्यासक्रम) २०२४-२५ पासून (दुसरा सुधारित अभ्यासक्रम) |
| ८ | G4 | Retail Sale Associate | २०१९-२० पासून | २०२०-२१ पासून |
| ९ | G5 | Healthcare – General Duty Assistant | २०१९-२० पासून | २०२०-२१ पासून |
| १० | G6 | Beauty Therapist | २०१९-२० पासून | २०२०-२१ पासून |
| ११ | G7 | Physical Education and Sports Fitness Trainer | २०२०-२१ पासून | २०२२-२३ पासून |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | G8 | Agriculture – Micro irrigation Technician | २०१९-२० पासून | २०२२-२३ पासून |
| १३ | G9 | Tourism and Hospitality – Customer Service Executive (Meet & Greet) | २०१९-२० पासून | २०२२-२३ पासून |

उपरोक्त F6, G2 वG3 या विषयांची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी २०२५ मध्ये सुधारित अभ्यासक्रम व मूल्यमापन आराखड्यानुसार व उर्वरित इतर सर्व विषयांची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी २०२५ मध्ये प्रचलित अभ्यासक्रम व मूल्यमापन आराखड्यानुसार आयोजित करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे परिपत्रक क्र. रा.म./पापुइ.६/उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम/१८७६,.दिनांक १०/०४/२०१७ नुसार कला, वाणिज्य व विज्ञान शाखेमध्ये इ ११वी मध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना इ.११वी व १२ वी साठी च्या नियमित चार वैकल्पित विषयांपैकी (Elective Subjects)पैकी एक विषय वगळून व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील एक विषय निवडता येईल असे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१९/प्र.क्र.(२४३/१९)/एसडी-४, मंत्रालय (विस्तार), मुंबई -३२, दिनांक ०८ ऑगस्ट २०१९ मध्ये सुधारित विषय योजनेनुसार व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन शुद्धिपत्रक क्र.-संकीर्ण -२०२१/प्र.क्र.१२१/एसडी-४, दि.२५ फेब्रुवारी,२०२२च्या शासन निर्णयाला अनुसरूनNSQF अंतर्गतविषयाची निवड करता येईल.

समग्र शिक्षा मुंबई यांचे जा.क्र, रामशिअ/व्य.शि./४४ (71/16)2019/891, दि.१४ ऑगस्ट२०१९ च्यापत्रानुसार १० वी मध्ये जरी विद्यार्थ्यांनी उपरोक्त विषयातील व्यवसाय विषयांपैकी विषय निवडला नसेल तरी विद्यार्थ्यांना ११ वी मध्ये उपरोक्त विषयांची निवड करता येईल.

NSQF अंतर्गत इयत्ता १२ वी विषय क्रमांक F6,G1 व G2 या विषयाच्या अभ्यासक्रमा मध्ये मार्च २०२५ पासून बदल सुचविण्यात आले आहेत,तरी सदर विषयामध्ये उत्तीर्ण न झालेल्या विध्यार्थास व श्रेणी सुधार योजने अंतर्गत प्रविष्ट होणाऱ्या विध्यार्थास F6,G1 व G2 जुन्या अभ्यासक्रमा नुसार लगतच्या तीन म्हणजेच सन २०२३-२४ मधील पुरवणी परीक्षा व मार्च २०२५ ची नियमित व जुलै २०२५ ची पुरवणी परीक्षा या तीन संधी देण्यात आल्या असून जुलै २०२५ च्या परीक्षेनंतर कोणतीही संधी दिली जाणार नाही.जे विद्यार्थी मार्च २०२५ किंवा त्यापूर्वी दोन संधी देवूनही सदर विषयामध्ये उत्तीर्ण न झाल्यासविद्यार्थ्याने उपरोक्त बदललेला विषय न घेता त्याला कला,वाणिज्य व विज्ञान या शाखेसाठी जो शासन निर्णय दि.०८ ऑगस्ट २०१९ विषय योजनेतील योग्य विषयाची निवड करून पुनश्च परीक्षेस प्रविष्ठ होवून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल.

संदर्भीय क्र.०३ -- पत्रकातील इ.०९वी व इ.११वी साठी नमूद केलेल्या माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांची विषय योजना, मूल्यमापन योजना व नामिका तसेच इतर बाबी लागू राहतील याची नोंद घ्यावी.

तसेच सदर विषयाचे अभ्यासक्रम पंडित सुंदरलाल शर्मा सेन्ट्रल इन्स्टिट्यूटऑफ व्होकेशनल एज्युकेशन (PSSCIVE) भोपाल या संस्थेचे मान्यताप्राप्त असल्याने, शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे NSQF अंतर्गत असलेल्या व्यवसाय शिक्षण विषयास मंडळाची वेगळी विषय मान्यता शाळा/उच्च माध्यमिक विद्यालयांनी घेण्याची आवश्यकता नाही. सदर अभ्यासक्रम PSSCIVE संस्थेच्या www psscive.nic.inया संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. सदर परिपत्रक संबधित शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांचे निदर्शनास आणून शाळांच्या सूचना फलकावर लावण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय मंडळास सादर करावा.

(अनुराधा ओक)
सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे-०४

ठिकाण–पुणे
दिनांक ०८/१०/२०२५

प्रत माहितीस्तव सविनय सादर,

१. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मुंबई
२. मा. आयुक्त (शिक्षण) पुणे.
३. मा.राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप,मुंबई.
४. मा.आयुक्त, मुंबई महानगरपालिका,मुंबई.
५. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका,पुणे.

प्रत माहितीतथाआवश्यक त्याकार्यवाहीसाठी -

१. मा.राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा, मुंबई.
२. सर्व विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे.
३. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
४. शिक्षणाधिकारी(माध्यमिक) सर्व जिल्हा परिषदा.
५. शिक्षणाधिकारी(माध्यमिक). पुणे व मुंबई महानगरपालिका.
६. मा. व्यवस्थापक,गणकयंत्र विभाग पुणे.
७. शाखा प्रमुख,परीक्षा विभाग